**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.व्ही.एस.शेंडे
मुख्याध्यापक, संजीवनी मतिमंद पाठशाळा मंगरुळ,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाज कल्याण अधिकारी (गट अ),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक,
समाज कल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९+१६०+१६१+१६२/ सोलापूर/२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाज कल्याण अधिकारी (गट अ),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. म.न. कावळे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक,
समाज कल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, सोलापूर

**सहायक जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता,
समाजकल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, सोलापूर
श्री.र.मा.माने

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १५९ /सोलापूर | १३.१०.२००५ | ४.४.२००६ | -- | -- |
| १६० /सोलापूर | १०.८.२००५ | ४.४.२००६ | १.९.२००५ | -- |
| १६१ / सोलापूर | २२.७.२००५ | ४.४.२००६ | ९.८.२००५ | -- |
| १६२ / सोलापूर | ९.८.२००५ | ४.४.२००६ | १.९.२००५ | -- |

## ८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

### अपील क्र.१५९/सोलापूर

(१)श्री.ब.म.जेऊर, लेखापाल, मूक-बधिर शाळा,अक्कलकोट हे १ जानेवारी २००१ ते २१ ऑक्टोबर २००४ पर्यंत समाजकल्याण अधिकारी, गट-अ येथे प्रतिनियुक्तीवर होते. या काळात त्यांना कोणते कामकाज दिले होते त्याची यादी. उपस्थिती पत्रकाच्या छायांकित व प्रमाणित प्रती.
(२)शासनमान्यताप्राप्त अनुदानित शाळेची अनुज्ञप्ती तथा नोंदणीप्रमाणपत्र फेटाळलेल्या शाळेतील कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर घेता येत नाही याबाबतचा शासन निर्णय, परिपत्रक, अधिनियमव कायदा यातील कलम/उपकलम, तसेच सदर अधिनियम व कायद्याचे अनुषंगाने केलेले नियम-नियमावली मिळावी.
(३)जेऊरे यांच्याव्यतिरिक्त अन्य अशासकीय /अन्य शाळेतील कर्मचारी काम करीत असल्याचे दिसून येते. त्या शाळा अनुज्ञप्तीप्राप्त आहेत काय, त्यांना आपणाकडे प्रतिनियुक्ती दिलेली आहे काय? त्या अशासकीय कर्मचाऱ्यांची मागणी करणेबाबतचा ठराव केला आहे काय, असल्यास प्रत.

### अपील क्र.१६०/सोलापूर

माहितीचा अधिकार अधिनियम कोणासाठी आहे, माहिती कोण विचारु शकतो, अनुज्ञप्ती फेटाळलेल्या शासनमान्यताप्राप्त अनुदानित संस्थेने माहितीच्या अधिकारात कोणतीही माहिती, माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट अ, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे अर्ज करु नये याबाबतचा शासन निर्णय, परिपत्रके, जिल्हा परिषदेने केलेले ठराव, तसेच अधिनियम, कायदा(कलम उपकलमासह)अथवा याबाबत केलेले नियम, नियमावली मिळावेत. आमच्या शाळेवर अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ नुसार फौजदारी गुन्हा कधी दाखल करणार, आजपर्यंत का दाखल केला नाही, कोणाच्या आदेशानुसार.

**अपील क्र.१६१/सोलापूर**

अपंग शाळा व संस्थांना कोणी भेटी द्याव्यात, पदनामे. समाजकल्याण अधिकारी व त्यांच्या कार्यालयातील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता व अन्य अधिकारी क्षेत्रीय कामकाजासाठी दरवर्षी किती शाळांना भेटी देतात. निश्चित केलेले उद्दिष्ट, अचानक भेटी, पूर्वनियोजित भेटी किती व कशा. तसेच त्यांच्याबरोबर असणारे सहकारी, त्यांची पदनामे (उदा. मित्र व तत्सम आणि शासकीय कर्मचारी यामध्ये लिपिक, चालक किंवा शिपाई). सन २००३-२००४ या वर्षात समाजकल्याण अधिकारी व वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता यांनी समक्ष भेट दिलेल्या शाळांची यादी. भेटीचा उद्देश काय होता. अहवालाच्या छायांकित व प्रमाणित प्रती.

**अपील क्र.१६२/सोलापूर**

(१)समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांचे कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या बदल्या झालेल्या आहेत. किती अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या. नाम व पदनिहाय यादी.
(२)शासकीय बहुद्देशीय अपंग मुलांचे संमिश्र केंद्र, सोलापूर येथील कर्मचाऱ्यांच्या कोठे कोठे बदल्या झाल्या, कार्यमुक्त केल्याच्या कागदपत्रांच्या छायांकित व प्रमाणित प्रती. कार्यमुक्त न केलेल्या कर्मचाऱ्यांकडील कामकाजनिहाय यादी, कार्यमुक्त न करण्याचा उद्देश. रिक्त जागेवर बदलून आलेल्या कर्मचाऱ्यांची यादी. रिक्त जागेवर किती अशासकीय कर्मचारी यांना प्रतिनियुक्ती /नियुक्ती केलेली आहे. कामकाजनिहाय यादी.

## विवेचन

संजीवनी मतिमंद पाठशाला, मंगरुळ, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर या संस्थेचे अर्जदार म्हणून नाव नमूद करुन मुख्याध्यापक श्री.व्ही.एस.शेंडे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे विविध स्वरुपाची माहिती चार अर्जाद्वारे मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम कोणासाठी आहे, माहिती कोण विचारु शकतो, येथपासून आमच्या शाळेवर / संस्थेवर फौजदारी गुन्हा कधी दाखल करणार, आजपर्यंत का केला नाही, अनुदान का बंद केले गेले, येथपर्यंत विविध स्वरुपाचे प्रश्न त्यांनी विचारले होते. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना उत्तर दिले. परंतु त्या

माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री.शेंडे यांनी प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये केलेला हा अर्ज व अपील होते. तरीही केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपील मानून आयोगाने ती दाखल करुन घेतली. 'सुनावणीची आणि समक्ष उपस्थितीची आवश्यकता नाही', असे कळवून श्री.शेंडे आयोगापुढील सुनावणीस उपस्थित नव्हते.

संजीवनी मतिमंद पाठशाला या शाळेचे नोंदणी प्रमाणपत्र आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी फेटाळले आहे. त्यामुळे सध्या सदर शाळा बंद आहे. याबाबतचे अपील मंत्री, सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे प्रलंबित आहे. परंतु नोंदणी प्रमाणपत्र फेटाळण्याचा निर्णय श्री.शेंडे यांना मान्य नसल्यामुळे माहितीचा अधिकार व अन्य स्वरुपाचा पत्रव्यवहार ते सातत्याने करीत असतात. सुमारे ३० ते ४० अर्ज त्यांनी केले असून दरवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री.र.मा.माने व अपिलीय प्राधिकारी श्री.म.न.कावळे यांनी सांगितले. त्याच्या पुष्ट्यर्थ पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली. दिलेल्या माहितीव्यतिरिक्त आवश्यक असणारी व या कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती कार्यालयीन वेळेत येऊन प्राप्त करुन घ्यावी, असे जन माहिती अधिकाऱ्यांच्या प्रत्येक पत्रात नमूद केले आहे. परंतु श्री.शेंडे कधीही आले नाहीत, असे त्यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.शेंडे हे प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , सोलापूर यांच्यापुढेही उपस्थित राहिले नाहीत, असेही जन माहिती अधिकाऱ्यांच्या निवेदनात म्हटले आहे.

गेली ५-६ वर्षे शाळा बंद असून विषय वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व मंत्री पातळीवर प्रलंबित आहे. सर्व पातळ्यांवर बराच पत्रव्यवहार या संदर्भात होत आला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनीही श्री.शेंडे यांना वेळ देऊन चर्चेसाठी बोलाविले होते. पण ते आले नाहीत. संबंधित विषयाबाबतची कोणतीही कागदपत्रे त्यांना दाखविण्याची आमची तयारी आहे, परंतु ते येत नाहीत. माहिती मिळण्यापेक्षा शाळा बंद असतानाही अनुदान मिळावे ही त्यांची मुख्य मागणी आहे, असेही श्री.र.मा.माने व श्री.म.न.कावळे यांनी नमूद केले.

शाळेला अनुदान मिळावे हीच प्रमुख मागणी असल्याचे आयोगाला सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत हा विषय येत नाही. अपीलकर्त्यास वेळोवेळी जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे व आवश्यक असलेली अन्य माहिती देण्याची तयारी आहे असेही दिसते. हे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपीले अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. २५/२ /२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

प्रा. डॉ. पुरणचंद्र पांडुरंग पुंजाल
तिरुपती निवास, सुपुरण, टी.पी.१, फा.प्लॉ.नं.२९/१/१/२, पद्मनगर,
लक्ष्मी मंदिर जवळ, सोलापूर- ४१३ ००६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** प्रा. डॉ. पुरणचंद्र पांडुरंग पुंजाल, तिरुपती निवास, सुपुरण, टी.पी.१, फा.प्लॉ.नं.२९/१/१/२ब, पद्मनगर, लक्ष्मी मंदिर जवळ, सोलापूर- ४१३ ००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
श्री. पी.वाय.बिराजदार

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
श्री. गंगाधर म. दुलंगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.१०.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.११.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१२.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.१.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने बी.ओ.टी. (बांधा, वापरा, हस्तांतरण करा) ह्या योजनेखाली जी चार कामांची सुरुवात केली त्या कामांच्या जागेवर जे आरक्षण होते ते आरक्षण न काढता बांधण्यास सुरुवात केली. कराराप्रमाणे काम न झालेल्या मक्तेदारास दंड केलेला नाही. चारही ठिकाणच्या बांधकामाची बांधकाम परवानगी घेतलेली नाही. चारपैकी एक जागा नाल्याची आहे. ती जागा जिल्हाधिकाऱ्यांची आहे, त्यांची परवानगी न घेता बांधकाम करण्यात आले. सभागृहाला विश्वासात न घेता कायदेशीर बाबी डावलून मनमानेल तशी बी.ओ.टी. ची कामे करण्यात आलेली आहेत. आयुक्तांनी कोणतीही कारवाई केलेली नाही, त्याची माहिती

## विवेचन

'बांधा, वापरा, हस्तांतरण करा' या योजनेखाली सोलापूर महानगरपालिकेतर्फे केल्या जाणाऱ्या चार बांधकामांच्या संदर्भात अपीलकर्ता प्रा.डॉ.पुरणचंद्र पांडुरंग पुंजाल यांनी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती दिली, परंतु अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरुन डॉ.पुंजाल यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपिलाची सुनावणी झाली. सुनावणीसाठी पुढील तारीखही देण्यात आली, त्या तारखेच्या आदल्या दिवशीच अंतिम निर्णय देण्यात आला, म्हणून डॉ.पुंजाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

डॉ.पुंजाल यांनी मागितलेली सर्व माहिती दिली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. काही मुद्यांवर संक्षिप्त व तांत्रिक उत्तरे दिली आहेत. तपशील दिलेला नाही, असे डॉ.पुंजाल यांनी अपिलात नमूद केले आहे. (उदा.कराराचा भंग झालेला असला तरी काय कार्यवाही केली, या प्रश्नावरील उत्तर 'कराराप्रमाणे कार्यवाही केलेली आहे' असे दिले आहे.) मात्र प्रथम अपिलात डॉ.पुंजाल यांनी मूळ अर्जापेक्षा अधिक तपशिलाची मागणी केली आहे, असे दिसते. अशा प्रकारे मूळ अर्जापेक्षा अधिक मागणी अपिलात करता येणार नाही.

या चार बांधकामांपैकी एक बांधकाम नाल्याच्या जागेवर आहे, ही जागा जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यातील आहे, जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेताच बांधकाम करण्यात आलेले आहे, हे

बेकायदेशीर आहे की नाही, हा डॉ.पुंजाल यांच्या अर्जातील मुख्य मुद्दा आहे. याच विषयावर अन्य काही नागरिकांनी दि.४.१०.२००७ रोजी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असल्याचे अपिलीय प्राधिकारी श्री.बिराजदार यांनी निदर्शनास आणले.

प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबत डॉ.पुंजाल यांनी दुसऱ्या तारखेचा उल्लेख केला असला तरी लेखी निवेदन देण्यास त्यातील तारखेपर्यंत मुदत दिलेली होती, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. पुढील तारीख मागितलेली असतानाही पुढील तारीख दिली नाही, असे डॉ.पुंजाल यांचे म्हणणे आहे.

जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेताच बांधकाम करण्यात आल्याचे डॉ.पुंजाल यांनी म्हटले आहे. एम्प्लॉयमेंट चौकाच्या पूर्वेला असलेला नाला कोणाच्या मालकीचा आहे, त्यावरील बांधकाम करण्यासाठी परवानगी घेतली आहे काय, जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी मिळण्याआधीच बांधकाम झाले आहे का, अशी नेमकी माहिती त्यांनी विचारली असून ती दिलेली नाही. ती देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) नाल्याच्या जागेवर जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेण्यापूर्वी बांधकाम करण्यात आले आहे का, हा तपशील नेमकेपणाने अपीलकर्त्यास द्यावा. याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१५.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र — पुणे

पुणे
दि.२५.२.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख,
४१२, तुळजाभवानी नगर, अक्कलकोट रोड,
सुतमिल मागे, सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद
बांधकाम क्र.२, सोलापूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद,
बांधकाम क्र.२, सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८० / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख,
तुळजाभवानी नगर, अक्कलकोट रोड, सुतमिल मागे, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद
बांधकाम क्र.२, सोलापूर, जि. सोलापूर श्री. बी.एस. भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद,
बांधकाम क्र.२, सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.३.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. श्री. एम.सी.कवेकर २. श्री. बी.आर.माने ३. श्री. एस.एस.तांबोळी ४. श्री.एस.डी.भोसले ५. श्री. चं.क. साटम ६. श्री. य.जे. चव्हाण या अधिकारी व कर्मचाऱ्यांची घेतलेल्या जाब-जबाबाच्या नकलासहित माहिती.

## विवेचन

कार्यकारी अभियंत्याच्या बांधकाम गैरकारभाराबाबत सहा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिलेल्या जाबजबाबाच्या प्रती अपीलकर्ता साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख यांनी मागितल्या होत्या. संबंधित कार्यवाही जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभाग, क्र.१ यांच्याकडून झालेली आहे. म्हणून आपल्या विभागाकडे कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे नमूद करुन कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद, बांधकाम क्र.२, सोलापूर यांनी श्री.शेख यांचा अर्ज परत पाठविला. त्याविरुध्द श्री.शेख यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. संबंधित कार्यवाही उपमुख्य कार्यकारी (प्रशासन), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या स्तरावरुन झालेली असल्याने संबंधित कागदपत्रे या कार्यालयात उपलब्ध नाहीत, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील नामंजूर केले. त्याविरुध्द श्री.शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी खरी माहिती दडपण्यासाठीच दिशाभूल करणारे उत्तर दिले, असा आक्षेप श्री.शेख यांनी नोंदविला. परंतु तसा कोणताही उद्देश नव्हता, असे जन माहिती अधिकारी श्री.एन.एम.हैनाळकर व अपिलीय प्राधिकारी श्री.बी.एस.भोसले यांनी नमूद केले. वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनसुार जन माहिती

अधिकाऱ्यांनी श्री.शेख यांचा अर्ज पाच दिवसात संबंधित कार्यालयाकडे पाठवावयास हवा होता. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही त्याची दखल घेऊन कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु कायदा नुकताच अस्तित्वात आला असल्यामुळे याबाबतची कल्पना नसल्यामुळे चूक झाली, असे श्री.एन.एम.हैनाळकर व श्री.बी.एस.भोसले यांनी स्पष्ट केले. हा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

श्री.शेख यांना संबंधित नस्ती अवलोकनार्थ सात दिवसात उपलब्ध करुन द्यावी व त्यातील त्यांना आवश्यक असलेल्या प्रती नि:शुल्क द्याव्यात,असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार संबंधित माहितीची टिपणी पान क्र.१ ते ५ व पत्रव्यवहार पान क्र.१ ते २४७, श्री.शेख यांना पुरविण्यात आल्याचा अहवाल कार्यकारी अभियंता श्री.बी.एस.भोसले यांनी दि.१२.१०.२००७ (प्राप्त दि.२०.१०.२००७) च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे.
दि. २५/२ /२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ.प्राजक्ता गोपाळराव बेणारे
रा.घ.नं.३००६, ताकपिठे विठ्ठल मंदिराच्या बोळात,
चौफाळा, पश्चिमद्वार, पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.३, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.प्राजक्ता गोपाळराव बेणारे
रा.घ.नं.३००६, ताकपिठे विठ्ठल मंदिराच्या बोळात,
चौफाळा, पश्चिमद्वार, पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी, सोलापूर
श्री.मा.गो.मांडुरके

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.३, सोलापूर
श्री.डी.पी.भालेदार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.९.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>१.उजनी उजवा कालव्याला जोडण्यात आलेल्या वितरिका क्र.२८ तयार करण्यासाठी लोकांच्या ज़मिनी आपल्या खात्यामार्फत संपादित करण्यात आल्या त्यासाठी कोणाचे किती जमीन क्षेत्र संपादित केले. संपादित जमिनींचा मोबदला दिला का, दिला नाही तर का नाही व दिला असेल तर कोणाला, किती.<br>२.नियोजित संत विनोबा प्रतिष्ठान ह्या ट्रस्टची वाखरी हद्दीतील जमीन गट क्र.४१०/२ब/३१अ/२१ब/२ ही आहे. या जमिनीमधून ही वितरिका जाते, तरी संपादित झालेली जमीन किती, याबाबत ट्रस्टला किती मोबदला दिला गेला, मोबदल्याची रक्कम कोणाला दिली त्यांचा नाव व पत्ता, तसेच चेकने किंवा रोखीने दिली असल्यास तपशील | |

## विवेचन

उजनी उजवा कालव्याला जोडलेल्या वितरिकेसाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनीच्या संदर्भातील १२ मुद्दयांची माहिती अपीलकर्त्या डॉ.प्राजक्ता गोपाळराव बेणारे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा भूसंपादन समन्वय अधिकारी, सोलापूर यांनी संबंधित अर्ज पंढरपूर तालुक्यातील भूसंपादनाच्या संदर्भातील असल्यामुळे विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.३, सोलापूर या जन माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविला. संबंधित भूसंपादन प्रकरणी डॉ.बेणारे अथवा सहखातेदाराला भूसंपादन खात्याने पाठविलेली नोटीस सादर करावी, असे पत्र ज़न माहिती अधिकाऱ्यांनी डॉ.बेणारे यांना पाठविले. आपण या प्रकरणी त्रयस्थ पत्राच्या भूमिकेत असल्यामुळे

आपल्याला अशा प्रकारची नोटीस येण्याची शक्यता नाही, तसेच १२ वर्षांपूर्वीची नोटीस सादर करण्यास सांगणे याचाच अर्थ माहिती टाळण्याचा प्रयत्न आहे, असे डॉ.बेणारे यांनी राज्य माहिती आयोगापुढे केलेल्या अपिलात नमूद केले आहे. डॉ.बेणारे यांनी गट क्रमांक जन माहिती अधिकाऱ्यांच्या लक्षात यावा म्हणून ७/१२ चा उतारा अर्जासोबत जोडला होता. वाखरी, ता.पंढरपूर येथील नियोजित संत विनोबा प्रतिष्ठान यांच्या नावाचा हा उतारा असून या प्रतिष्ठानच्या संपादित जमिनीबद्दलची माहिती डॉ.बेणारे यांनी मागितली होती. या उताऱ्यावर अध्यक्ष कु.निर्मला देशपांडे व कार्याध्यक्ष डॉ.गोपाळ गोविंद बेणारे यांची नावे आहेत. डॉ.बेणारे यांनी माहिती मागितली ते प्रकरण फार वर्षांपूर्वीचे असल्याने त्या प्रकरणातील समाविष्ट कोणत्याही खातेदारास प्राप्त नोटीस , पत्रव्यवहार इत्यादी उपलब्ध करुन द्यावा, त्यानंतर एका महिन्यात जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी श्री.मधुकर आर्दड यांनी दिला. हा निर्णय अमान्य असल्याचे नमूद करुन डॉ.बेणारे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्याला अशी नोटीस मिळण्याची शक्यता नसल्यामुळे मागितलेली प्रत आपण देऊ शकत नाही, याचा डॉ.बेणारे यांनी आयोगापुढील सुनावणीत पुनरुच्चार केला. वितरिकेच्या कामासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबतची अनेक प्रकरणे असतात, केवळ गावाच्या नावावरुन सर्व माहिती शोधणे कठीण असते, कोणत्याही नोटिशीची प्रत मिळाली असती की प्रकरणाचा क्रमांक व साल एवढा संदर्भ मिळाल्यावर सर्व माहिती शोधता येते, म्हणून डॉ.बेणारे यांचे सहकार्य मागितले होते, ते मिळाले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.३, सोलापूर श्री.डी.पी.भालेदार यांनी केले. भूसंपादन कार्यालयात अशा नोटिशीची प्रत मिळविणे शक्य होते. तसे प्रयत्न केले गेले नाहीत म्हणजेच माहिती देण्याबाबत तत्परता दाखवली नाही, असे प्रतिपादन डॉ.बेणारे यांनी केले. विशेष भूसंपादनाची अकरा कार्यालये आधी होती, त्यानंतर अधिकाऱ्यांची संख्या कमी होत गेली व भूसंपादनाची प्रकरणे वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे वर्ग केली गेली. त्यामुळे जुनी प्रकरणे शोधणे अवघड जाते, अनेकदा अनेक

पदांचा अतिरिक्त कार्यभार असण्याचाही यात भाग होता. माहिती शोधण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला, असे अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी श्री.मा.गो.मांडुरके यांनी विस्ताराने स्पष्ट केले. अशा अडचणी असूनही, डॉ.बेणारे यांना अपेक्षित असलेल्या प्रकरणाचा शोध घेऊन दि.२९.११.२००६ रोजी त्यांना माहिती दिली, असे श्री.डी.पी.भालेदार यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

एकूण निवेदने व कागदपत्रे यांचा विचार करता जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देणे हेतुतः टाळलेले नाही. विलंबाची कारणे योग्य आहेत, असे दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ११.२.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. काकासाहेब नामदेव जाधव
मु.पो. केम, ता. करमाळा, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
सोलापूर, जि. सोलापूर — उत्तरवादी

माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
प्राथमिक आश्रमशाळा, केम, ता. करमाळा,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. काकासाहेब नामदेव जाधव,
मु.पो. केम, ता. करमाळा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
सोलापूर, जि. सोलापूर श्री. एम. आर. वैद्य

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, केम,
ता. करमाळा, जि. सोलापूर श्री. देविदास गोपाळ यादव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

इयत्ता पहिली ते सातवी वर्गाच्या हजेरी पटाची प्रत, विद्यार्थ्यांची माहिती व इयत्ता तिसरीचे वर्गाचे जुलै २००६ च्या हजेरीपत्रकाची प्रत

## विवेचन

अपीलकर्ता श्री. काकासाहेब नामदेव जाधव यांनी प्राथमिक आश्रमशाळा, केम, ता. करमाळा, जि. सोलापूर मधील इयत्ता पहिली ते सातवी या वर्गांची जुलै २००६ मधील हजेरी पत्रकाची मागणी केली होती. इयत्ता तिसरी वगळता इतर हजेरी पत्रकांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रम शाळा, केम, ता. करमाळा यांनी दिल्या. अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री. जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. त्यांच्याकडून विहित मुदतीत निर्णय न मिळाल्यामुळे श्री. जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री विठ्ठल देवस्थान ट्रस्ट या संस्थेतर्फे ही शाळा चालविली जाते. संस्थांतर्गत वादामुळे अनेक तक्रारी सातत्याने होत आल्या आहेत. श्री. जाधव यांच्या पत्नीला संस्थेने कामावरुन कमी केल्यामुळे वाद निर्माण झाला होता. आता त्यांना पुन्हा कामावर घेतल्यामुळे वाद संपला आहे, असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनावरुन स्पष्ट झाले. आपल्याला हवी असलेली माहिती मिळण्यास विलंब झाल्याचे श्री. जाधव यांनी नमूद केले. मात्र तत्कालीन मुख्याध्यापक श्री. हरिश्चंद्र बबन साळुंके यांनी मूळ पत्राला दिलेल्या उत्तरात 'इयत्ता तिसरीचे हजेरी पत्रक संबंधित शिक्षिकेने कार्यालयाला सादर केले नसल्यामुळे देता येत नाही, ते सादर झाल्यावर देण्यात येईल', असे अन्य माहिती देतानाच नमूद केले आहे. श्री. साळुंके यांना मुख्याध्यापक पदावरुन दूर करण्यात आले असून ते आता शिक्षक-पदावर कार्यरत आहेत, असे श्री. वैद्य यांनी सांगितले.

मुख्याध्यापकपदावरुन श्री. साळुंके यांना दूर करणे हीच मोठी शिक्षा आहे, असे श्री. वैद्य यांचे म्हणणे मान्य करुन श्री. जाधव यांनी दंडात्मक व अन्य कारवाईबाबत आग्रह धरला नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

पुणे
दि. २०.२.२००८

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सदाशिव दत्तात्रय निकम
रा. टेक्निकल हौसिंग सोसायटी,
प्लॉट क्र.१४, ए-वॉर्ड, वाशी रोड,
जि.कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था
(दुग्ध), कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी रोड, जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
कार्यकारी संचालक, 'गोकुळ'
कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.,
शिरगाव, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२९ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २२.५.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १२.७.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २३.८.२००७ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००० ते डिसेंबर २००६ या कालावधीतील कायम/तात्पुरत्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता, वर्गवारीनुसारची माहिती, तसेच कर्मचाऱ्यांची टी. एस. व एम. ही सांकेतिक वर्गवारी ज्या ठरावाने करणेत आली त्या ठरावाची किंवा शासन मंजुरीची प्रमाणित प्रत, नेमणुकांचे निकष (दर्जा, शैक्षणिक अर्हता, अनुभव) संबंधी नियम/ठरावाची प्रमाणित प्रत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सदाशिव दत्तात्रय निकम यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी संचालक, गोकुळ, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ, शिरगाव, कोल्हापूर यांच्याकडे कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका व पदोन्नती देतानाचे निकषाबाबतची प्रत इत्यादी माहिती मागितली होती. परंतु याबाबत जन माहिती अधिकारी, तसेच अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे श्री. निकम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने आयोगाच्या दि. ५ जानेवारी २००८ चे पत्रानुसार माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व अपीलकर्ता म्हणून श्री. निकम यांचेकडून सद्यस्थिती बाबतची माहिती प्राप्त होणेसाठी कळविण्यात आले होते. त्यानुसार अनुक्रमे दि. १४ जानेवारी व १८ जानेवारी २००८ चे पत्रानुसार माहिती अधिकारी व अपीलकर्ता यांचेकडून प्राप्त झालेला खुलासा विचारात घेता अपीलकर्ता यांनी शुल्क भरुन माहिती घेणे आवश्यक आहे.

सबब, आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता यांनी हवी असलेली माहिती आवश्यक ते शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ११.२.२००८

मा. माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. राजेंद्र धोंडीराम कुंभार
मु.पो. लोणी देवकर, ता. इंदापूर,जि. पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा
व्यवस्थापक, बिगरशेती कर्ज विभाग,
पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.,
४, बी. जे. रोड, पुणे-४११ ००१ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
इन. उपव्यवस्थापक,
बिगरशेती कर्ज विभाग,
पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.,
४, बी. जे. रोड, पुणे-४११ ००१

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २३२ / पुणे | -- | -- | -- | -- |
| ९०९ / पुणे | -- | -- | -- | -- |

मुळ अर्जात मागणी केलेली माहिती

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पुनर्गठण, तसेच नवीन कर्ज व थकबाकी या संबंधित माहिती

## निकालपत्र

अपीलकर्ता श्री. राजेंद्र धोंडीराम कुंभार यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक जि. पुणे या बँकेच्या पुनर्गठण, तसेच नवीन कर्ज व थकबाकी या संबंधात माहिती विचारली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. कुंभार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना दि. २३.११.२००७ व दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये विचारणा केली होती. श्री. कुंभार यांनी दि. ११.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये आपणास आवश्यक असलेली माहिती मिळाल्याने सदरहू दोन्हीही अपीले निकाली काढण्याबाबत आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

सदरची दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७.०२.२००८**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल विठ्ठल पाटील
मु.पो. महिसगांव, ता. माढा, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
सोलापूर, जि. सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, संत रोहिदास पतसंस्था मर्यादित,
बारलोणी, ता. माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३+ २६४ / सोलापूर /२००६ |
| २ | सुावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुनिल विठ्ठल पाटील, मु.पो. महिसगांव, ता. माढा, जि. सोलापूर
श्री.पंडित विठ्ठल पाटील, रा.मु.पो.महिसगाव, ता.माढा, जि.सोलापूर
**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपाबिंधक सहकारी संस्था,सोलापूर
जि. सोलापूर श्री. अशोक द. भांडवलकर

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, संत रोहिदास पतसंस्था मर्यादित,
बारलोणी, ता. माढा, जि. सोलापूर श्री. सिध्देश्वर इंद्रजित नवगिरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.३.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

श्री संत रोहिदास ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून दि.१५.२.२००१ व दि. ११.८.२००३ रोजी घेतलेल्या कर्जाचे कर्जरोखे व ते कर्ज भरलेले खाते उतारे. कर्ज खतावणीच्या छायांकित प्रती व सर्व कागदपत्राच्या प्रती, तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा महिसगाव, शाखेचे चेकबुक चेक नंबर ३५०९१ ते ३५०८३ ते ९० एकूण नऊ चेक परत मिळावे

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुनिल विठ्ठल पाटील व पंडित विठ्ठल पाटील यांनी श्री संत रोहिदास ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, बारलोणी, ता.माढा, जि.सोलापूर या संस्थेकडून माहिती मागितली होती. आपल्या पतसंस्थेला शासनामार्फत कोणतीही मदत मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ आपल्याला लागू होत नाही अशी भूमिका संस्थेने अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्यापुढे मांडली. संस्थेची भूमिका मान्य करुन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी श्री.पाटील यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द अपीलकर्ता श्री.सुनिल विठ्ठल पाटील व पंडीत विठ्ठल पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य विधान मंडळाने केलेल्या कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण माहितीच्या अधिकार कायद्याच्या कक्षेत येते. महाराष्ट्र सहकार कायदा १९६१ अन्वये पतसंस्था स्थापन झाली असल्यामुळे तिला हा कायदा लागू होतो, असे प्रतिपादन श्री.पाटील यांनी लेखी निवेदनात केले आहे.

श्री.पंडित विठ्ठल पाटील यांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महिसगाव, ता.माढा शाखेचे दहा कोरे चेक पतसंस्थेला आपण दिले असून ते परत मिळावेत, अशी मागणी केली होती. श्री.सुनिल विठ्ठल पाटील यांनीही वरील शाखेचे नऊ कोरे चेक परत मिळावेत, कर्जरोखे, कर्ज भरलेला खातेउतारा यांची मागणी केली आहे.

दोघांनीही कोरे चेक संस्थेला दिलेले नाहीत. तसेच ते संस्थेचे सभासद असल्यामुळे योग्य ते शुल्क भरल्यानंतर त्यांना कर्जरोखा व खातेउतारा यांची प्रत देण्यात येईल, असे पतसंस्थेच्या निवेदनात म्हटले आहे. दोन्ही अपीलकर्त्यांकडे अनेक संस्थांची थकबाकी आहे त्यामुळे वसुली टाळणे, त्रास देणे यासाठी ते असे अर्ज करीत असतात. संत रोहिदास पतसंस्थेने त्यांच्याविरुध्द न्यायालयात दावे केलेले आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर श्री.अशोक द.भांडवलकर यांनी सांगितले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि.२५.२.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सतीश हरिबा शिंदे
रा. होनमुर्गी, ता. दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा
गट विकास अधिकारी (वर्ग -१),
पंचायत समिती, दक्षिण सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
कक्ष अधिकारी, पंचायत समिती,
दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सतीश हरिबा शिंदे, रा. होनमुर्गी, ता. दक्षिण सोलापूर जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी (वर्ग -१),
पंचायत समिती, दक्षिण सोलापूर श्री. सी.एम.वासुदेव

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती,
दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर सौ. एम.एस. रकटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.६.२००४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.९.२००४ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सन २००४.०५ मधील समाज कल्याण कार्यालयामार्फत मिळणाऱ्या विविध योजनांचे प्रस्तावांचे निरीक्षणाबाबत माहिती

## विवेचन

होनमुर्गी, ता. दक्षिण सोलापूर येथे पंचायत समिती (समाजकल्याण) विभागाकडून सन २००४.०५ मध्ये विविध योजनांमध्ये सादर केलेल्या लाभार्थी प्रस्तावांच्या निरीक्षणाची मागणी अपीलकर्ता श्री. सतीश हरीबा शिंदे यांनी केली होती. या अर्जावर, तसेच प्रथम अपिलावर कोणतीही कार्यवाही केली गेली नाही, म्हणून श्री. शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. शिंदे यांनी मागितलेली माहिती देऊ केली असता अन्य माहितीही ते मागतात. आपण महिला कर्मचारी असल्यामुळे आपल्याला त्रास देण्यासाठी विविध प्रकारचे अर्ज सातत्याने करीत असतात, कार्यालयात येऊन अयोग्य पध्दतीने वागतात, अशी तक्रार जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन कक्ष अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर सौ.एल.ए.लोंढे यांनी केली. या आरोपात तथ्य नसून सौ. लोंढे कार्यालयात येणाऱ्या नागरिकांशी सौजन्याने वागत नाहीत, अशी लेखी तक्रार आपण मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे केली आहे, असे श्री. शिंदे यांनी नमूद केले आहे. आपणही श्री. शिंदे यांच्या अयोग्य वर्तनाबद्दल वरिष्ठांकडे लेखी तक्रार केली असून श्री. शिंदे यांनी गट विकास अधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना गट विकास अधिकाऱ्यांच्या परस्पर भेटू नये, अशी सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लेखी दिली आहे, असा प्रतिवाद सौ. लोंढे यांनी केला. उभय बाजूंनी आपापल्या निवेदनाच्या संबंधातील कागदपत्रे सादर केली. हा वादविषय असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तत्कालीन गट विकास अधिकारी श्री. बी. एम. वासुदेव यांनी सांगितले. अशा प्रकारचे आरोप / प्रत्यारोप हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शी संबंधित विषय नाही. श्री. शिंदे यांनी मागितलेली माहिती त्यांना दिली गेली आहे. कोणत्याही नागरिकांनी कार्यालयीन शिस्त व वर्तनाच्या मर्यादा पाळून अर्जाबाबतची चौकशी, कागदपत्रांचे निरीक्षण याबाबतची कार्यवाही केली पाहिजे, याची जाणीव संबंधितांना देण्यात येत आहे.

अपीलकर्त्याने मागितलेल्या कागदपत्रांचे निरीक्षण पंधरा दिवसात करु द्यावे व आवश्यक ती माहिती योग्य ते शुल्क आकारुन द्यावी. अपीलकर्ता श्री. शिंदे व संबंधित कागदपत्रांची जबाबदारी असणाऱ्या तत्कालीन कक्ष अधिकारी सौ. लोंढे यांच्यातील वाद लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१ श्री. बी.एम. वासुदेव यांनी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सौ. एम.एस.रकटे यांच्या उपस्थितीत ही कार्यवाही पार पाडावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. परंतु आपल्याला दि. २९.११.२००७ पर्यंत कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे श्री. शिंदे यांनी आयोगाला कळविले आहे. मात्र दि. १६.१०.२००७ रोजी कागदपत्रांच्या अवलोकनासाठी उपस्थित राहण्याबाबत श्री. शिंदे यांना दि. ८.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविल्याचे व सौ.लोंढे यांनी कागदपत्रांचा निर्णय व माहिती उपलब्ध करून देण्याचे काम करावे, अशी सूचना दिल्याचे गट विकास अधिकारी वर्ग-१ श्री. बी.एम. वासुदेव यांनी कळविल्याचे पत्र आयोगाला सादर केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य.

२. अपीलकर्त्यास आवश्यक ते अभिलेख उपलब्ध करुन दिल्याबाबतचा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांनी दि. १५.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. प्रथम अपिलाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील बंधनकारक मुदतीत दिला गेला पाहिजे, याची जाणीव अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१ श्री. सी. एम. बासुदेव याना करून देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७.२.२००८**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रामगोंडा शिवनिंगप्पा पाटील,
५६२, स्वामी विवेकानंद नगर (विमानतळ),
होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार कल्याण व
जनता संपर्क अधिकारी, सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रामगोंडा शिवनिंगप्पा पाटील,
५६२, स्वामी विवेकानंद नगर (विमानतळ),होटगी रोड,
सोलापूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, सोलापूर महानगरपालिका,सोलापूर
श्री. जी. आर. गोडबोले

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार कल्याण व जनता संपर्क अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर श्री. एल.एस. जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मखरेवाडी ग्रामपंचायत ठराव क्र. ८१(९) आ.नं. ४९७५ दि. २०.३.१९९२ अन्वये श्री. अप्पाशा सिद्रामप्पा हतुरे यांनी सादर केलेल्या अर्जाची प्रत व अर्जाप्रमाणे केलेली कार्यवाहीच्या छायांकित प्रती

## विवेचन

मखरेवाडी ग्रामपंचायतीच्या आकारणी नोंदवहीमधील नोंदीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.रामगोंडा शिवनिंगप्पा पाटील यांनी मागितली होती. विहित मुदतीत ती न मिळाल्यामुळे श्री.पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. योग्य ते शुल्क आकारुन संबंधित कागदपत्रे श्री.पाटील यांना त्वरित द्यावीत, असा आदेश देऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. अपुरी माहिती, मिळाल्याच्या कारणावरुन श्री.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दरम्यानच्या काळात आपल्याला माहिती मिळाली असून आपली तक्रार राहिलेली नाही, मात्र आपल्याला ही माहिती नि:शुल्क मिळणे आवश्यक होते, तरीही २८/- रुपये शुल्क घेण्यात आले आहे, असे श्री.पाटील यांनी नमूद केले. श्री.पाटील यांची तक्रार रास्त आहे.

आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क देणे आवश्यक असताना घेतलेले शुल्क परत करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सोलापूर महानगरपालिका श्री.जी.आर.गोडबोले यांनी करुन पूर्तता अहवाल दि.१५.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि.२५.२.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे